# सातारा नगरपरिषद, सातारा

## वृक्षप्राधिकरण विभाग

## जाहिर निवेदन

२/- सातारा शहर नागरिकांना कळविणेत येते की, सातारा नगरपरिषदेने अमृत योजनेअंतर्गत शहरामध्ये विविध रस्त्यांवर वृक्षारोपण केलेले आहे. शहरातील वाढलेल्या वृक्षांच्या फांदया काही व्यावसायिक तसेच काही रहिवासी विनाकारण तोडत आहेत. वृक्षांच्या फांदयांना दोरी बांधणे अथवा फांदी मोडून ठेवणे असे प्रकार होत असलेचे आढळून आलेले आहे. शहरामध्ये वृक्षारोपण पर्यावरणासाठी केलेले असून त्यांचे रक्षण करणे व जतन करणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

तरी शहरातील व्यावसायिक तसेच नागरिक यांना कळविणेत येते की, कोणत्याही कारणास्तव नगरपरिषदेने रस्त्यांवर लावलेल्या झाडाच्या फांदया तोडू नयेत, त्यामध्ये कसलाही बदल करू नये, फांदयाना दोरी बांधू नये. तसेच नगरपरिषदेने लावलेली झाडे विनापरवाना तोडू नये. वरील निवदेन प्रसिध्दीकरण झालेनंतर रस्त्यावरील झाडांच्या बाबतीत वरील नमूद केलेला प्रकार आढळून आलेस आपलेवर झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम २१ अन्वये नगरपरिषदेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-<br>
(अभिजित बापट)<br>
मुख्याधिकारी तथा प्रशासक<br>
सातारा नगरपरिषद, सातारा